International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# मानवी जीवनात स्पर्शाचे महत्व

**प्रा.डॉ.म्हात्रे सुभाष ल.**
वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय
*corresponding Author*- प्रा.डॉ.म्हात्रे सुभाष ल.
Email: subhashmhatre66@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.6988561

**प्रस्तावना :—**

स्पर्श हा शब्द केव्हापासून अस्तित्वात आला हे सांगता येत नसले तरी मात्र मानवी मेंदूत जेव्हापासून जाणीव व संवेदना विकसित होण्यास सुरुवात झाली तेव्हापासून स्पर्श हि शारीरीक व मानसिक प्रक्रिया अस्तित्वात येऊन विकसित झाली. पंचज्ञानेद्रियांपैकी स्पर्श एक महत्तवपूर्ण ज्ञानेंद्रिंय असून सर्व प्राणी मात्रामध्यै आपल्या भावभावना, विचार मानातील गुप्तता कळविण्यासाठी, स्पर्शाचा उपयोग केला जातो. मेंदूच्याद्वारे मनाला स्पर्शाची सूचना होते. त्यातून भावना कळविल्या जातात व कृती घडते. स्पर्श हि एक जाणिव असून त्यामध्ये त्याचा मन, हृदय, भाव इत्यादि शारिरीक घटकांमार्फत होणाऱ्या प्रक्रियेचा संबंध येतो. स्पर्शामुळे एखादयास दुसऱ्याच्या मानसिक इच्छा कळते, म्हणून स्पर्श हे भाषेइतकेच मानवी व्यवहाराचे सर्वत्र उपयुक्त माध्यम आहे.

**व्याख्या :—**

१) कोणत्याही प्रकारच्या शारिरीक संपर्कास स्पर्श म्हणतातत्र

२) भोवतालच्या सजिव—निर्जिव घटकांशी होणाऱ्या अभाषिक संवादातून जागृती होणारी संवेदन प्रक्रिया म्हणजे स्पर्श होय.

३) शब्दांशिवाय किंवा बोली भाषे खेरीज होणारा संवाद किंवा संप्रेषण म्हणजे स्पर्श होय.

४) संकेत, शब्द किंवा बोली भाषेविना जागृत करणारी किंवा मनाला सचेत करणारी शारिरीक क्रिया म्हणजे स्पर्श.

५)नि:शब्दरित्या मनातील भावना किंवा हलचल कळविण्याचे तसेच जाणवण्याचे शारिरीक माध्यमास स्पर्श म्हणतात.

**स्पर्शाचे महत्व :—**

मानवी जीवनातील सर्वात महत्तवाची व आवश्यक अटळ क्रिया म्हणजे स्पर्श होय. स्पर्शामुळेच माणसाचे या भौतिकक जगात मन रमले आहे. स्पर्शाला भूतकाळाचा संदर्भ असल्याकारणाने मनुष्याला स्पर्शात गुढता भासते. ‘‘स्पर्शामुळे मानवी शरिरातील सुप्तग्रंथी सेचत होवून फुलतात आणि स्त्राव सोडतातत्र ग्रंथीद्वारे स्त्राव निघून रक्तात मिसळतो. त्यामुळे शरिरात नवीन चेतना निर्माण होते. स्पर्शामुळेच माणसाला या गुढ शक्तीची जाणिव होते. म्हणून माणसाने स्पर्शाला देवता मानले आहे. भारतीय संस्कृतीमध्ये स्पशाला सत्यनारायणा संबोधले आहे. स्पर्शसत्य असल्याचे भारतीय संस्कृतीने मान्य केले आहे. सर्व हिंदू समजात घरोघरी सत्यनारायणाची पूजा करतात. विवाह झाल्यानंतर पतिपत्नी मिलनापूर्वी स्पर्शाची म्हणजेच सत्यनारायणाची पूजा घालतात. नव्या घरात गृह प्रवेश करण्यापूर्वी सत्यनारायणाची पूजा घालतात.

नव्या घरात सुखसमृध्दी लाभो, भरभराट होवोव, घर सुजलाम, सुफलाम होवो म्हणून स्पर्श देवता सत्यनारायणाची पूजा करतात.

स्पर्शात विश्वास, हमी आणि बांधिलकी असते. स्पर्शात मोह, माया, करूणा आणि माणुसकी सामावलेली असते. मात्र स्पर्श कोण कोणाला करते यावर त्याचा परिणाम अवलंबून असतो. स्पर्शामागे भावनांची गती असते. रडणाऱ्या बाळाला आईचा स्पर्श होताच बाळ रडण्याचे थांबते. त्याला स्पर्शाची जाणीव होवून बाळ रडणे थांबते. वासराला गाईने स्पर्श करताच वासरू गाईच्या जवळ जाऊन थांबते.

दुःखी माणसाच्या बाबतीत सहानुभुतिपर त्याच्या पाठीवरून हात फिरविला असता त्याचे दुःख कमी होते. तरूण वयात मुलामुलींचे एकच लक्ष्य असल्याकारणाने दोघांच्या स्पर्शाची भाषा एकच असते. त्यातून सारखीच समज आणि उर्जा निर्माण होवून परिणाम देखिल सारखेच घडून येतात. त्यांच्या दृष्टीने स्पर्श म्हणजे अद्‌भुत गोष्ट होय. या स्पर्शातील अद्‌भुततेमुळेच दोघेही या स्पर्शाकडे सतत आकर्षित होऊन स्पर्श हव्यास निर्माण होते. स्पर्श मिळाल्यास आनंद आणि न मिळाल्यास दुःख, विरह निर्माण होते.

स्पर्शाचे आकर्षण, उत्कंठता, गुढता यामुळे तो सतत दुःख चक्रांत अडकलेला असतो. नव्हे तर संपूर्ण मानव जीवन याच दृष्टचक्रांत अडकलेला आहे. एक भ्रामक सुखाच्या स्पर्श भावनेतून त्याला अनेकांशी अनेक वेळा खोटे बोलावे लागते. आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. कधी, हिंसा, अत्याचार, बलात्कार या सारख्या अनेक दुष्टघटनाक्रम आणि परिणामांत तो अडकतो आणि आयुष्यभर दुःख, यातना भोगत असतो. इतिहासात डोकावून पाहिले असता भारतीय समाज स्पृश्य–अस्पृश्य या दृष्टचक्रांत अडकला आहे. समाजात शील–अशील, शुध्द–अशुध्दतेची कल्पना उदयास आली. जाती अंतर्गत स्पर्शाला महत्व प्राप्त होवून जातीबाहय स्त्री–पुरूष स्पर्शाला त्याज्य मानले. जातीचा तो नियम होऊन त्याचे उल्लंघन करणाऱ्यास जातीकडून शिक्षा दिली जात होती.

**स्पर्श आणि व्यक्ति सापेक्षता :–**

स्पर्शात निरपेक्षभाव किंवा समताभाव देखिल असु शकतो. हे दैनंदिन व्यवहारातील अनुभवावरून स्पष्ट होते. माणसात आवड–नावड भाव असतो. आवडणाऱ्या व्रूक्तीचा स्पर्श हवासा वाटतो. तर नावडत्या व्यक्तीचा स्पर्श नकोसा वाटतो. याच आवड–नावड भाव स्पर्शातून शत्रुत्व आणि मित्रत्व भाव विकसीत झाला. परकीय व्यक्तीला स्पर्श करू नये अशी नैतिकता आहे.

परंतु सामुहिक जीवनात निष्काम भावनेतुन जेव्हा एकत्रित येण्याचा प्रसंग येतो, तेव्हा स्पर्शाचे काही महत्व नसते. त्या स्पर्शाने एखादया व्यक्तीच्या चारित्र्याला कुठलीच बाधा निर्माण होत नाही.

**स्पर्श आणि सभ्यता :–**

स्पर्शातून सभ्यता दिसून येते. ज्या ठिकाणी अनेक लोक एकत्र येत असतात. अथवा प्रवासात आपला इतराच धक्का लागू नये म्हणून व्यवस्थित बसणे हाचाल न करणे या गोष्टीकडे लक्ष दिले जाते. सुशिक्षित, सज्जन, शीलवान सुसंस्कृत लोक अशी सभ्यता पाळतात. आपल्या अस्तित्वाचा इतरांना त्रास होऊ नये म्हणून सभ्यतने बसतात. सहप्रवासात महिला, वृध्द, लहान बाळ किंवा इतर कोणीही असते. त्यांचा आदर करुन त्यांना आपला स्पर्श होणार नाही याची दखल होऊनच प्रवास करतात. बौध्द संस्कृतीच्या काळात भारतीय लोक बौध्द भिक्कु व अनुयायींना अशीच सभ्येतेची व आदराची वागणूक देत असत.

भारतात बौध्द धर्माचा प्रचाार आणि प्रसारामुळे भारतीय समाजात सभ्यता आणि सुसंस्कृतपणाचा देखील प्रसार झाला. बौध्दधर्मीय भिक्कु आणि अनुयायी इतरांना स्पर्श होऊन त्याची अप्रतिष्ठा होईल या कारणाने कुणाला स्पर्श होऊ देत नसतत्र हा एक सभ्यतेचा भाग होय.

**स्पर्श आणि आव्हान :–**

परस्परात वैर असलेल्या दोघांत शब्दीक बाचाबाची झाल्यानंतर प्रकरण हात घाईवर येण्यापूर्वी दोघे एकमेकांत अंगाला हात लावण्याचे आव्हान करतात. अंगाला हात तर लावून दाखव, मग पाहतो अशा शब्दात अंगाला स्पर्श करण्याचे आव्हान दिले जाते. म्हणजे स्पर्शात जरब, धाक, वजन, अहंकार, आणि ताकद आहे. अंगाला हात न लावण्याचे आव्हान करणे, म्हणजे मी एक बलवान व्यक्ती असून तू माइया अंगास हात लावू शकत नाहीस. एखादया बलबान व्यक्तीच्या अंगास कोणी दुर्बल व्यक्ती हात लावू शकत नाही.

**सारांश :–**

पंचज्ञानेद्रयांपैकी स्पर्श हा एक ज्ञानेद्रिय आहे. स्पर्शामुळे माणसातील सुप्त–भावना जागृत होतात. नवीन ज्ञान कल्पना सुचतात. मनुष्याच्या जीवनात स्पर्शाला महत्व आहे. मानवी जीवनातून स्पर्श काढून टाकला तर मानवी जीवन निरर्थक ठरेल. स्पर्शाला साद–प्रतिसाद असल्यामुळे माणसाला सामाजिक व कौटुंबिक जीवन अनुभवता आले स्पर्शव्दाराचे माणसाला अनेक नाते संबंध निर्माण करता आली.

**संदर्भ :–**

१) गडकरी जयंत – समाज आणि धर्म ग्रंथाली प्रकाशन १९४९.–पान नं. १४८
२) ढेरे रा.चि.– लज्जागौर.–पदमगंध प्रकाशन– पान नं.५९, ७१, १००
३) कोसंबी धर्मानंद –प्राचीन भारतीय संस्कृती–डायमंड पब्लिकेशन पान नं. ४०, ४१
४) सांकृतायन राहुल–बौध्द संस्कृती, दोन शब्द पान नं. ७, ८
५) डॉ आंबडेकर बी. आर. –अस्पृश्य मूळचे कोण पान नं. ७०